**स्थायी निर्देश क्र.४३**

**नगरपरिषद खात्यामध्ये रक्कम शिल्लक नसताना धनादेश वितरीत न करणेबाबत.**

नगरपरिषद प्रशासन संचालनालय
शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला
सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई-३०
परिपत्रक क्र.नपाप्र/४/२०एलए/२/११/१४०९५/कक्ष-९/५००
25 FEB 2016 फेब्रूवारी २०१६

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने संचालनालयाचे असे निदर्शनास आले आहे की, नगरपरिषदांची आर्थिक स्थिती नाजूक असतानांही तसेच काही नगरपरिषद खात्यामध्ये रक्कम शिल्लक नसतानांही आगाऊ धनादेश ठेकेदार व पुरवठाधारक यांना नगरपरिषद खात्यात निधी जमा होईल या अपेक्षेवर वितरीत केले जातात. सदरची बाब गंभीर व नियमबाह्य स्वरुपाची आहे.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता २०११ मधील प्रकरण १० मधील कलम १५७ ते कलम १६१ तसेच प्रकरण ११ मधील कलम १७१ ते कलम १७९ नुसार धनादेश प्रदान करणेबाबतची जबाबदारी लेखापाल व मुख्याधिकारी यांची आहे. लेखा संहितेनुसार पुढील तारखेचे धनादेश (Post Dated Cheque) देण्याची तरतूद नाही.

तसेच पराक्रम्य दस्तऐवज कायदा (Negotiable Instrument Act) नुसार खात्यात शिल्लक नसताना देणेत आलेला धनादेशाचा अनादर (Cheque Dishonour) झाल्यास फौजदारी गुन्हा होऊ शकतो.

तरी अशा प्रकारच्या घटना घडू नये यासाठी देयक अदा करणेपूर्वी बँक पासबुक मधील शिल्लक रकमेची पडताळणी (Passbook Verification) आणि खर्चमेळ (Reconciliation) करण्याची दक्षता घ्यावी व त्यानंतरच आवश्यक त्या रकमेचा धनादेश वितरीत करण्याची दक्षता घ्यावी.

भविष्यात नियमबाह्य पध्दतीने धनादेश वितरीत करण्याचे प्रकार आढळल्यास या बाबीस जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

मीता राजीवलोचन

( मीता राजीवलोचन )
प्रधान सचिव
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रत :-

१. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक (सर्व)
२. जिल्हाधिकारी (सर्व)
३. मुख्याधिकारी नगरपरिषद / नगरपंचायती (सर्व)

complaint Aurangabad division